
**Review of Research**
International Online Multidisciplinary Journal

ISSN: 2249-894X Impact Factor : 3.1402(UIF) Volume - 5 | Issue - 6 | March - 2016

# मौर्य कालखंडातील शेती एक अभ्यास



प्रा. गौतम गोविंद सोनवणे
इतिहास विभाग, एस. बी. कॉलेज, शहापूर जि. ठाणे.

**सार –**

प्रस्तुत लेखात मौर्य कालीन शेती व्यवसायाचा अभ्यास करण्यात आला आहे. मौर्य कालीन शेतकरी, पाणी पुरवठा योजना,प्रमुख पिके शेतीची वाटणी, करव्यवस्था, शासकीय मदत यांचा अभ्यास पूर्ण आढावा घेतला आहे.

**प्रस्तावना –**

प्राचीन भारताच्या इतिहासात मौर्यांचा कालखंड महत्व पूर्ण कालखंड म्हणून ओळखला जातो. BC- 322 ते BC-187 या दीर्घ कालखंडात मौर्यांनी भारतावर एकसंघ राज्य स्थापन केले होते. मौर्यांनीच भारतावर एक छत्री अमल प्रस्थापीत करून उच्च दर्जाचे आदर्श आणि संस्कार निर्माण केले. उत्कृष्ठ प्रशासन व्यवस्थेची निर्मिती करून लष्कर, न्याय, कायदा, धर्म, कला, राजनीती, अर्थव्यवस्था, जनकल्याण, बंधुत्व व मानवतावादाची प्रस्थापना मौर्य सम्राटांनी केली. याच काळात नवीन राजकीय जीवनाला आणि सांस्कृतिक जीवनाला प्रारंभ झाला. मौर्यांच्याच राजवटीत भारतीय संस्कृती,कला आणि धर्माचा प्रसार भारताबाहेर झाल्याने भारताचा बौद्ध धर्म विश्वधर्म बनला.

मौर्य साम्राज्य संस्थापक चंद्रगुप्त मौर्याने एक विशाल साम्राज्य उभे केले.सम्राट अशोकाने या साम्राज्याचा प्रचार प्रसार जगभर केला. मौर्यांचे साम्राज्य बलाढ्य होण्यात राजकीय, सामाजिक, धार्मिक,व सांस्कृतिक जीवनाबरोबर आर्थिक जीवनाचा मोठा वाटा होता. आर्थिक घटकातील व्यापार उद्योगाप्रमाणे मौर्य काळात शेती व्यवसाय प्रगत आणि विकसित असल्याचे दिसते.त्यामुळे मौर्यांची अर्थ व्यवस्था भक्कम पायावर उभी असल्याचे दिसते.

**मौर्य कालीन शेतीच्या अभ्यासाची साधने –**

1) कौटिल्याचे अर्थशास्त्र.
2) मेगेस्थेणीसचा इंडिका.
3) जातक कथा.
4) रुम्मीनदेई शिलालेख.
5) जुनागड शिलालेख.

**1) शेती – मौर्य कालीन उत्पन्नाचे प्रमुख साधन –**

शेती हे मौर्य कालीन उत्पन्नाचे प्रमुख साधन मानले जाते. समाजाच्या अर्थोत्पादनाचा आणि उदरनिर्वाहाचा अतिशय महत्वाचा व्यवसाय म्हणून शेतीकडे पहिले जात होते. कौटिल्याने अर्थशास्त्र ग्रंथात मौर्य कालीन शेती विषयी विस्ताराने लिहिले आहे. या काळात राज्याच्या मालकीच्या जमिनी प्रमाणे खाजगी मालकीची जमीन होती. राज्याच्या मालकीच्या जमिन स्वतंत्र असून या जमिनीची देखरेख आणि लागवड 'सीताध्यक्ष' नावाचा अधिकारी पाहत असे. ही शेती ही गावाच्या अवतीभोवती होती. शेतीच्या पलीकडे जनावरांसाठी कुरणे असत. या कुरणावर सर्व समाजाची मालकी असे मौर्य काळात शेतीला एवढे महत्व होते की युद्धमान राष्ट्रेही एकमेकांच्या शेतीवर हल्ला किंवा नासधूस करीत नसत.[1]

**2) मौर्य कालीन शेतकरी –**

अनेक साधनावरून मौर्य कालीन शेतक–याबद्दल माहिती मिळते या काळातील शेतकरी हुशार, कष्टाळू आणि प्रामाणिक होता. शेतकरी हा समाजाच्या पाठीचा कणा होता. मौर्य काळात बहुसंख्य लोकांचा मुख्य व्यवसाय शेती होता. शेतक–याला राज्याचे संरक्षण होते. शेती व्यवसायात प्रगती व्हावी म्हणून सरकार शेतक–यांना अनेक सोयी, सुविधा उपलब्ध करून देत असे. उत्कृष्ट दर्जाची बी–बियाणे, शेतीला पाणी पुरवठा व्हावा म्हणून कालवे, पाटबंधारे सरकारने बांधून दिल्याचे उल्लेख अनेक साधनातून मिळाले आहेत, क्वचित प्रसंगी दुष्काळ पडला तर मौर्य कालीन राजे सरकारी गोदामातून धान्य वाटप करीत असत. यावरून मौर्य काळातील शेतकरी सुखी संपन्न असल्याचे आढळते.[2]

**3) पाणी पुरवठा योजना –**

मौर्य काळात शेती हा प्रमुख व्यवसाय असल्याने मौर्य सम्राटांनी शेती व्यवसायला महत्व दिल्याचे दिसते. चंद्रगुप्त मौर्याचा प्रांतीय शासक पुष्यगुप्त याने सुदर्शन तलाव बांधल्याची माहिती जुनागड शिलालेखातून मिळते. त्यानंतर या तलावाची दुरूस्ती आणि त्याचा विस्तार सम्राट अशोकाचा सुभेदार तुषास्प याने केल्याचे उल्लेख मिळाले आहेत. मौर्य कालीन पाणी पुरवठयाबाबत मगेसस्थेणीसच्या इंडिका ग्रंथातून ही महत्वापूर्ण माहिती मिळते. नदी, तलाव व धरणातून शेतीला पाणी पुरवठा केला जात असे. या शिवाय शासना तर्फे लहान सहान पाटबंधारे बांधून शेतीला पाणी पुरवठा केला जात असे. नदीचे पाणी अडवून शेतीला पाणी पाणी देण्याची प्रथा याच काळापासून सुरू झाली असल्याचे मानले जाते शासनाच्या पाणी पुरवठयाच्या सोयी मुळे मौर्य कालीन शेतीतून विविध प्रकारची पिके काढली जात असत. अशा प्रगत शेती व्यवसायामुळे शासनाला कर रूपाने प्रचंड उत्पन्न मिळत असे त्याचाच परिणाम मौर्य कालीन अर्थव्यवस्था मजबूत होण्यात झाला.[3]

**4) शेतीतून घेतली जाणारी पिके –**

सुदर्शन तलाव, नद्या, विहिरी, मुबलक पाऊस यामुळे मौर्य कालीन शेतीतून विविध प्रकारची पिके घेतली जात असत. तांदूळ, तिळ, मूग, उडीद, सातू, गहू, मका, बार्ली, कापूस, उस, द्राक्षे, आळशी, खरबूजे, भोपळे, विविध पालेभाज्या व फळभाज्य त्याचबरोबर कडधान्य, मसूर, आलू, इ चे भरघोष उत्पन्न घेतले जात असल्याचे दिसते.[4]

**5) शेतीची वाटणी –**

कौटिल्याच्या अर्थशास्त्र ग्रंथावरून मौर्य कालीन शेती दोन भागात विभागल्याचे दिसते एक म्हणजे राज्याच्या मालकीची जमीन होय. या जमिनीची माहिती देताना कौटिल्य म्हणतो "गाईच्या हंबरण्याचा आवाज जिथं पर्यन्त जाईल तिथं पर्यंतची जमीन ब्राह्मणांना व तपसव्यांनादिली जात असे". याशिवाय मृगयावण, शिकारीवन व हत्तीवन राज्याच्या मालकीच्या जमिनीतून द्यावे लागत असे. तर दुसरी जमीन म्हणजे खाजगी मालकीची जमीन होय. ही जमीन लहान सहान तुकड्यात विभागलेली होती. शेत मालक आणि त्यांची मुले ही जमीन कसत असत. या जमिनीत कसण्याजोगे शेतीचे क्षेत्रही विकसित असे. एका शेतात जवळ जवळ पाचशे नांगर चालत असत. जातक कथामधून सुमारे एक हजार व आठ हजार एकर शेती असलेले ब्राह्मण लोक इतर लोकांकडून लागवड करून घेत असत.[5]

**6) करव्यवस्था –**

मौर्य कालीन साधनातून कर प्रणाली विषयी सविस्तर माहिती मिळते. या काळात भाग हा जमीन महसूल कर म्हणून व बाली हा जमिनीची खंडणी म्हणून कर रूपाने राजाला दिली जात असे. मेगेस्थेणीस च्या मते शेतक–याला उत्पन्नाच्या 4था हिस्सा कर रूपाने द्यावा लागत असे. मौर्य काळात कमी उत्पन्न मिळर्णाया शेतर्कयाला 6वा हिस्सा कर द्यावा लागत असल्याचे मत डॉ. रोमिला थापर यांनी मांडले आहे . मौर्य काळातला महान शासक सम्राट अशोकाने लुंबिनी या बुद्ध जन्म ठिकाणी कर कमी करून 8 वा हिस्साएवढा केला होता. या शिवाय मौर्य राजवटीत पशू धन कर,आयात निर्यात कर, बंदरे कर, बाजार कर ,जकात कर, वस्तूंच्या खरेदी–विक्री कर,पाणी पट्टीकर, जुगार कर त्याच बरोबर न्यायालयीन दंड, नजरणे, भेटी, या मार्गानेही सरकारला उत्पन्न मिळत असे.[6]

**7) शासकीय मदत –** मौर्य कालीन शेती उत्तम दर्जाची होती. मुबलक पाणी पुरवठयाची सोय,जमिनीचा कसदारपना, युद्ध काळात ही शेतीला धक्का न लावण्याची पद्धत इत्यादी कारणामुळे शेती क्षेत्र प्रगत आणि विकसित झाले होते. जर कांही वेळा अतिवृष्ठी किंवा दुष्काळचे संकट आले तर शासनातर्फे शेतर्कयाला सर्व प्रकारची भरघोस मदत केली जात असल्याचे अनेक पुराव्यावरून सिद्ध झाले आहे. नैसर्गिक संकट निवारणाच्या सर्व उपाय योजनांची अमलबजावणी शासना मार्फत केली जात असे. पाणी पुरवठयात वाढ करून करमाफीची सवलत शेतक–याला दिली जात असे. त्याच बरोबर गोदामातील धान्य मोफत वाटले जात असे. शेतीची अवजारे बी–बीयानांचे वाटप करून, शासनातर्फे जनावरांचे पालन पोषण केले जात असे. जर संकटातून शेतकरी वाचला नाही तर समाजाचे रक्षण होणार नाही याची जाणीव मौर्य सम्राटांना निश्चितच होती.[7]

**8) निष्कर्ष –** मौर्य काळातील शेती व्यवसाय प्रगती पथावर असल्याचे अनेक साधनवरून निदर्शनास येते. या काळातील शेतकरी हुशार, कष्टाळू, सुखी आणि समाधानी असल्याचे आढळते. शेतक–याला सर्व प्रकारची मदत शासन स्तरावर होत असल्याचे दिसते नैसर्गिक आपत्तीच्या वेळी शासन शेतर्कयांना सर्व प्रकारची मदत करीत असे. म्हणूनच मौर्य कालीन अर्थव्यवस्था मजबूत स्वरूपाची असल्याचे दिसते.

**संदर्भ –**

1) भिडे ग (1997) प्राचीन भारतीय संस्थांचा इतिहास,कोल्हापूर, फडके प्रकाशन पृ 62
2) कोलरकर श (2014) प्राचीन भारताचा राजकीय सामाजिक व सांस्कृतिक इतिहास,नागपूर, श्री मंगेश प्रकाशन पृ 111
3) नागोरी स नागोरी क (2007) प्राचीन भारतका सामाजिक सांस्कृतिक एंव आर्थिक इतिहास,जयपुर राज पब्लिसिंग हाऊस पृ 87
4) कदम य (2008) प्राचीन व मध्ययुगीन भारत , कोल्हापूर फडके प्रकाशन पृ 67
5) धारणकर स (2003) प्राचीन भारत– आर्थिक व सामाजिक वाटचाल,य च म मू नासिक पृ 3
6) रडे क (2014) प्राचीन भारत प्रारंभ ते 1200 पर्यन्त, जळगाव प्रशांत पब्लिकेशन पृ 215
7) काठारे अ,साखरे वि(2014) प्राचीन भारताचा इतिहास व संस्कृती औरंगाबाद विद्या बुक्स पब्लिशर्स



*प्रा. गौतम गोविंद सोनवणे*
*इतिहास विभाग, एस. बी. कॉलेज, शहापूर जि. ठाणे.*

